। बहूजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. No.
L2/RNP/PPR/04/2021-2023

FACEBOOK/
MANDESHVARTA

सांगोला * जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे * रविवार दि.२४ मे २०२६ * पाने ४ * मूल्य १ रू * अंक २१ वा

## सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी ६१६ मतदार

सोलापूर :– भारत निवडणूक आयोगाने दिनांक १८ मे २०२६ अन्वये महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक २०२६ करीता कार्यक्रम जाहीर केला आहे.सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी जिल्हा परिषद सोलापूर, सोलापूर महानगरपालिका तसेच १७ नगरपरिषद व नगरपंचायती अशा एकूण १९ स्थानिक प्राधिकारी संस्था असून त्यांची एकूण मतदार संख्या ६१६ आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली आहे. या ६१६ मतदारांची प्रारूप यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून ती जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, महानगरपालिका, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पंचायत समिती तसेच सर्व नगरपरिषद व नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत तपासणीसाठी उपलब्ध आहे. मतदार यादीतील नावाबाबत किंवा समावेशाबाबत कोणताही आक्षेप असल्यास तो दि.२७ मे २०२६ पूर्वी फॉर्म क्रमांक १७, ७ किंवा ८ मध्ये नोंदवून जिल्हाधिकारी कार्यालय, सहायक मतदार नोंदणी अधिकारी (निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर) यांच्या कार्यालयात सादर करावा किंवा टपालाने पाठवावा. निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला असून त्याचा दूरध्वनी क्रमांक ०२१७२७३१०१२ असा आहे, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

## तहसीलदारांना धमकी व बदनामी केल्याप्रकरणी युवकाविरोधात गुन्हा दाखल

सांगोला(प्रतिनिधी):–सांगोला तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी बाळूताई शिवाजी भागवत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाचेगाव खुर्द येथील एकावर सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. ११ मे २०२६ रोजी तहसील कार्यालय सांगोला येथे ई–सेवा केंद्र चालक व महा–ऑनलाईन केंद्र चालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत शासकीय सेवा व सेवा केंद्रांच्या कामकाजाबाबत चर्चा सुरू असताना एका व्यक्तीने अचानक आक्रमक भूमिका घेत तहसीलदारांबाबत अपमानास्पद व उद्धट भाषेत बोलण्यास सुरुवात केली. त्यामुळे बैठकीतील वातावरण बिघडून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादीत पुढे नमूद केल्याप्रमाणे, संबंधित व्यक्तीने कोणतीही लेखी तक्रार न देता सोशल माध्यमांवर व विविध ठिकाणी खोटे आरोप करून तहसील कार्यालयाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. तसेच शासकीय अधिकाऱ्यांचा अपमान करून मानसिक त्रास दिल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सांगोला पोलिसांनी महेश गुरव याच्याविरोधात शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, बदनामी करणे, धमकी देणे आदी कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे

# प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटन बळकटीची नवी दिशा– रणजितसिंह नाईक–निंबाळकर

**भाजपा सोलापूर ग्रामीणच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान २०२६ ला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

सांगोला (प्रतिनिधी):– पंढरपूर तालुक्यातील स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज, गोपाळपूर येथे भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान २०२६ कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रदेश सचिव आ. रामभाऊ सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गात संघटन मजबुती, विचारधारा, बूथ व्यवस्थापन, सोशल मीडिया, कार्यविस्तार, सर आणि देशासमोरील आव्हाने अशा विविध विषयांवर मान्यवरांनी सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटन बळकटीची नवी दिशा मिळेल असा विश्वास मा. खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपा पदाधिकारी, जिल्ह्यातील विविध मंडळांचे कार्यकर्ते, बूथ प्रमुख, बीएलए –१ प्रतिनिधी तसेच युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री पुनीत जोशी यांनी विकास, संगोपन आणि जबाबदारी जाणीव या विषयावर मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांनी समाजाशी सतत संपर्क ठेवून जबाबदारीने संघटन कार्य करावे, असे सांगितले. यावेळी श्री.महेरदीप महेश पाटणे यांनी एसआयआर



विषयावर मार्गदर्शन करत बूथ स्तरावर मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेची माहिती दिली. बोगस मतदारांची नावे कमी करणे, पात्र मतदारांची नोंदणी करणे आणि मतदार यादी अधिक पारदर्शक करण्यासाठी बीएलए–१ यांनी सक्रियपणे काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथवर जबाबदारीने काम करून संघटन अधिक सक्षम करावे, असेही त्यांनी सांगितले. योजना आणि पक्षाची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले. श्री सुरेश हळवणकर यांनी भाजपा इतिहास या विषयावर मार्गदर्शन करत भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेतला. पश्चिम महाराष्ट्र विभागीय संवादक श्री.योगेश बाचल यांनी बूथ व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन करत प्रत्येक बूथ हा पक्षाचा मजबूत पाया असल्याचे सांगितले. बूथनिहाय नियोजन, मतदार संपर्क, कार्यकर्त्यांमधील समन्वय आणि निवडणूक व्यवस्थापन यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच महाराष्ट्र राज्य ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार श्री योगेश (आण्णा) टिळेकर यांनी कार्यविस्तार या विषयावर मार्गदर्शन करत भाजपा विचारधारा गावागावात पोहोचविण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका घ्यावी, असे सांगितले. पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण संयोजक तथा जिल्हा सरचिटणीस श्री.सचिन शिंदे यांनी विचार परिवार या विषयावर मार्गदर्शन करत भाजपा ही केवळ राजकीय संघटना नसून राष्ट्रहिताची विचारधारा असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी वैचारिक बांधिलकी जपत समाजात काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सोलापूर ग्रामीण (माढा) जिल्हा प्रभारी श्री.संजय जगताप यांनी प्रशिक्षण वर्गास भेट देऊन संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला. श्री.भारत आमदापुरे यांनी देशासमोरील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करत राष्ट्रीय सुरक्षेपासून आर्थिक विकासापर्यंत विविध मुद्द्यांवर विचार मांडले. श्री.अनिकेत निकम यांनी सोशल मीडिया आणि नमो ॲप या विषयावर मार्गदर्शन करत डिजिटल माध्यमांचे वाढते महत्त्व स्पष्ट केले. सोशल मीडियाच्या माध्यमातून शासनाच्या प्रशिक्षण वर्गाचा निरोप समारंभ माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय पाणीदार माजी खासदार श्री रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. दिपक वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण वर्ग उत्साहात पार पडला. त्यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळात अधिक जोमाने संघटन कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणामुळे पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आभार जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती तथा भाजपा सोलापूर जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मानले. विविध विषयांवरील सत्रांमुळे कार्यकर्त्यांना संघटन, निवडणूक व्यवस्थापन, डिजिटल प्रचार आणि वैचारिक बांधिलकी याविषयी सखोल माहिती मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान संयोजक श्री. सचिन शिंदे, सहसंयोजक श्री. दत्तात्रय जाधव तसेच सर्व आयोजक समिती यांची सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

## कॉक्रोच जनता पार्टी प्रकरणात आता आयबीची एन्ट्री?– नाना पटोले




मुंबई:– कॉक्रोच जनता पार्टीचं ट्विटर अकाऊंट हॅक करण्यामागे केंद्रीय गुप्तचर यंत्रणेचा हात आहे, देशातील जनतेच्या उद्रेकाची माहिती आयबीनं केंद्राला दिली, गोपनिय अहवालानंतरच कॉक्रोच जनता पार्टीचं अकाऊंट हॅक करण्यात आलं, असा दावा नाना पटोले यांनी केला आहे. मला रिपोर्ट आला त्यानुसार आयबीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सांगितलं की उद्रेक होऊ शकतो. हा उद्रेक थांबवण्यासाठी याला ब्लॉक केलं पाहिजे, अशा पद्धतीची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली गेली, त्यानंतर हा निर्णय झाला आहे, असा दावा नाना पटोले यांनी केला आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, फक्त सोशल मीडियाचं अकाउंट बंद करून हा प्रश्न सुटणार नाही, तरुणांच्या मनात जो राग आहे, तो राग हे कमी करू शकत नाहीत, यांनी देश विकला आहे, आणि म्हणूनच देश वाचवण्यासाठी या पद्धतीचा आता उद्रेक सुरू झाला आहे, असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा देशात जाणवत असलेल्या पेट्रोल डिझेलच्या तुटवड्यावरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पेट्रोल–डिझेल, गॅस हा कोणाच्या चुकीच्या विदेश नीतीमुळे माहग झाला? याचं पहिल्यांदा त्यांनी आत्मपरीक्षण केलं पाहिजे. यांच्या धोरणामुळे आपला परंपरागत मित्र असलेला इराण आपल्यापासून दूर झाला, त्यामुळे देशात इंधनाचा तुटवडा निर्माण झाला असं पटोले यांनी म्हटलं आहे.

### आमच्या मतामुळे तुम्ही मुख्यमंत्री बनलात, आम्ही घरी येऊन तुम्हाला... उद्धव ठाकरेंच्या विधानावर बच्चू कडूंचा पलटवार हल्ल्याची तयारी करा, पुतिन यांचा संयम सुटला

मुंबई:– ‘उद्धव साहेबांकडून मला ही अपेक्षा नव्हती. पहिले ते मुख्यमंत्री झाले की, बच्चू कडू राज्यमंत्री झाले याचं उत्तर त्यांनी द्यावे. त्यावेळी माझ्याकडे दोन आमदार होते. मी शिवसेनेविरोधात निवडणूक लढवून विजयी झालो होतो. निवडणुकीनंतर आम्हाला सर्व पक्षाकडून निमंत्रण होते. मात्र एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आणि उद्धव साहेबांसोबत भेट घालून दिली. त्यावेळी आम्हाला वाटलं की उद्धव साहेबांना आपण पाठिंबा दिला पाहिजे.’ पुढे बोलताना बच्चू कडू यांनी म्हटले की, ‘मला एका प्रश्नाच उत्तर उद्धव ठाकरेंनी दिलं पाहिजे की, आम्ही घरी येऊन तुम्हाला मुख्यमंत्रीपदासाठी पाठिंबा दिला. आम्ही त्यावेळी कदाचित पाठिंबा दिला नसता तर चित्र वेगळं असू शकलं असतं.

## संपादकीय......

जुने वर्ष ४३ वे अंक २९ वा

# कांद्याचा वांदा !

सुमारे तीन वर्षांपूर्वी कांदा दरात घसरण झाल्यानंतर केंद्र सरकारने २,४१० रुपये प्रति क्विंटल दराने कांदा खरेदी केला होता. मधल्या काळात खते, बियाणे, मजुरी, औषधे, वाहतूक, वीज व साठवणूक खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. अशा स्थितीत आता शेतक–यांना त्याच्या निम्मा म्हणजे प्रति क्विंटल १,२३५ रुपये दर जाहीर केल्यामुळे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने या निर्णयाचा निषेध केला आहे. हा निर्णय शेतक–यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याची टीका संघटनेने केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतक–यांचा कांदा प्रति किलो १२ रुपये ३५ पैसे (प्रति क्विंटल १,२३५ रुपये) दराने खरेदी करण्याची घोषणा केली.

ही घोषणा अन्यायकारक व शेतकरीविरोधी असल्याची टीका कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केली. उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना सरकारने जाहीर केलेला दर अत्यंत अपुरा, अन्यायकारक आहे. जाहीर केलेल्या दरातून उत्पादन खर्चही भरून निघणार नाही. उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव देणे ही गंभीर बाब आहे. सरकारने तात्काळ निर्णय दुरुस्त करून शेतक–यांना न्याय द्यावा, अन्यथा उत्पादक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा दिघोळे यांनी दिला. कांदा उत्पादक शेतक–यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अल्प दराच्या निषेधार्थ सोमवारी राज्यात आंदोलनाच्या ठिणग्या पेटल्या. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) आणि शिवसेना (उबाठा) या दोन्ही प्रमुख विरोधी पक्षांनी आक्रमक पवित्रा घेत रस्त्यावर उतरून सरकारचा निषेध नोंदवला.

या आंदोलनामुळे राज्याच्या विविध भागातील वाहतूक विस्कळीत झाली. कांद्याची आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या लासलगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. शेतक–यांच्या घामाला दाम मिळावा आणि सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, या मागणीसाठी पवार यांनी लासलगावच्या बाजारपेठेत ठिय्या मांडला. आंदोलनापूर्वी आ. पवार यांनी कांदा लिलाव आवारात जाऊन कांदा उत्पादकांच्या समस्या जाणून घेतल्या. आंदोलनादरम्यान सरकारवर जोरदार टीका करताना ते म्हणाले, कांद्याचा उत्पादन खर्च प्रतिकिलो १८ रुपये असताना बाजारपेठेत तो २ ते ३ रुपये दराने विकला जात आहे. सरकारने कांद्याला २५ ते ३० रुपये प्रति किलो हमीभाव दिलाच पाहिजे. २०२३ मध्ये सरकारने २४ रुपये भाव जाहीर केला होता. मग आता साडेबारा रुपये का? महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेसह सर्वच आंदोलकांनी केंद्र सरकारच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

सरकारने कांद्याला किमान रास्त भाव द्यावा, निर्यात शुल्काबाबत स्पष्टता आणावी आणि हमीभावाचे ठोस धोरण राबवावे अशा प्रमुख मागण्या या आंदोलनाद्वारे करण्यात आल्या. छत्रपती संभाजीनगर येथे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आपल्या समर्थकांसह समृद्धी महामार्गावर 'रास्ता रोको' आंदोलन केले. यावेळी महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलकांनी महामार्गावर टायर जाळून निषेध व्यक्त केला. वैजापूर तालुक्यातील जांबगाव येथेही समृद्धी महामार्गावर 'चक्का जाम' आंदोलन करण्यात आले. वैजापूर पोलिसांनी या आंदोलनासाठी रीतसर परवानगी नाकारली होती. मात्र, तरीही मोठ्या संख्येने कार्यकर्ते महामार्गावर जमल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली होती. जानेवारी ते मे अखेरपर्यंत विक्री झालेल्या कांद्याला १,५०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान द्यावे या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी सरकारला एक आठवड्याचा अल्टिमेटम यावेळी देण्यात आला.

# रमय्या वस्तावय्या... रमय्या वस्तावय्या...

गीत आणि संगीत हे आपल्या चित्रपटाचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे आणि कायम राहील. चित्रपटाची कथा कितीही उत्तम असली तरी गीते आणि संगीत नि:संशयपणे कथेची शोभा वाढवितात. काही प्रेक्षकांची पावले चित्रपटाच्या कथेसाठी तर काहींची त्यातील श्रवणीय गीतांसाठी चित्रपटगृहांकडे वळतात; परंतु कधी कधी चित्रपटातील गीतात असे शब्द वापरले जातात की ज्यांचा अर्थ बहुतांशी श्रोत्यांना समजत नाही. पण अर्थ समजलेला नसतानाही लोक ते गीत गातात, गुणगुणतात आणि संधी मिळाली, तर त्यावर तालही धरतात. पूर्वीच्या काळातील असाच एक चित्रपट निर्मिती अवस्थेत असताना त्या चित्रपटाचे संगीतकार आणि गीतकार गीताची जुळवाजुळव करण्यासाठी खंडाळ्याला जात होते. चहासाठी ते मार्गावरील एका ढाब्यावर थांबले. ढाब्यावर काम करणारा तेलुगू भाषक मुलगा अन्य ग्राहकांकडे लक्ष देण्यात व्यग्र होता. तेव्हा त्या संचातील तेलुगू भाषा अवगत असलेला एक संगीतकार टेबलावर थाप मारत तेलुगू भाषेत त्या मुलाला बोलावू लागला. टेबलावर थाप मारताना त्या संगीतकाराच्या तोंडून बाहेर पडलेला तो तेलुगू शब्द ऐकून संचातील एका गीतकाराने एक अशी ओळ तयार केली की तो चक्क त्या चित्रपटाच्या एका गीताचा मुखडाच बनला!

एखाद्या हिंदी चित्रपटातील गीतात तेलुगू शब्दाचा वापर हा काय प्रकार आहे हे प्रथमत: लक्षात येत नाही; परंतु अभिनेते–निर्माते–दिग्दर्शक राज कपूर यांच्या 'श्री ४२०' या चित्रपटातील एका गीतात वापरण्यात आलेल्या तेलुगू शब्दाचा किस्सा अतिशय मनोरंजक आहे. 'श्री ४२०' चित्रपटातील एक गीत तयार करण्यासाठी संगीतकार शंकर आणि जयकिशन यांच्यासमवेत त्यांचे गीतकार शैलेंद्र व हसरत जयपुरी असे चौघे खंडाळ्याला चालले होते. अर्धे अंतर पार केल्यावर सगळ्यांनाच चहा व अल्पोपहार घेण्याची इच्छा झाली. काही अंतर पुढे गेल्यावर त्यांना एक हॉटेलवजा ढाबा दिसला. ढाब्याच्या बाहेर गाडी उभी करून ते आत गेले. आत ग्राहकांची गर्दी होती. ढाब्याचा वेटर आधी आलेल्या ग्राहकांकडे लक्ष देण्यात मग्न होता. मालकाने त्याला रमय्या अशी हक मारली तेव्हा त्याचे नाव रमय्या आहे हे या चौघांना समजले. या चौघांनी आणखी काही वेळ प्रतीक्षा केल्यावर रमय्या त्यांच्या टेबलाकडे आला. त्याच्याशी थोडे बोलणे झाल्यावर शंकर यांच्या लक्षात आले, की रमय्या तेलुगू भाषक आहे. शंकर यांचे कुटुंब मूळचे उत्तर प्रदेशमधील; पण शंकर यांचा जन्म हैदराबादेत झाला होता आणि तेथेच ते लहानाचे मोठे झाल्याने त्यांना तेलुगू भाषा अवगत होती. त्यांनी रमय्याला तेलुगू भाषेतूनच चहा आणि अल्पोपहार आणावयास सांगितले आणि चौघे चहा व खाणे कधी येते याची वाट पाहत बसले. पण रमय्या अन्य ग्राहकांमधेच अडकून पडल्याने त्याला बराच वेळ या चौघांसाठी चहा–अल्पोपहार घेऊन येता आले नाही. चौघेही वाट पाहून पाहून कंटाळले होते. तेवढ्यात शंकर यांनी रमय्या वस्तावय्या...

# थिएटरमध्ये स्वामी समर्थांचा जयजयकार : देऊळ बंद २'ची विक्रमी कमाई


२०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'देऊळ बंद' या चित्रपटाचा दुसरा भाग २१ मे २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी' नंतर आता प्रवीण तरडे यांचा हा चित्रपट दमदार कामगिरी करतोय. विशेष म्हणजे पहाटेच्या शोसाठीही प्रेक्षकांनी थिएटरमध्ये गर्दी केली आहे. अनेक थिएटर्समध्ये या चित्रपटाचे शोज हाऊसफुल्ल झाल्याचे पाहायला मिळत आहे.

अरे मोटेगावकरांकडे बघा विद्यार्थी पास व्हावेत म्हणून थेट अंगावर पाणीच टाकतायत, अशा आशयाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. ..

'देऊळ बंद २'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी २.४५ कोटी रुपयांची पेटी जमवली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी २.५५ कोटी रुपयांची कमाई झाली होती. 'देऊळ बंद २'च्या वीकेंडच्या कमाईत दुप्पट वाढ झाल्याचं पहायला मिळालं. पहिल्या शानिवारच्या कमाईचा आकडा ४.८५ कोटी रुपयांवर पोहोचला.

'देऊळ बंद २' या चित्रपटाने आतापर्यंत भारतात ९.८५ कोटी रुपयांचं नेट कलेक्शन आणि ११.६२ कोटी रुपयांचं ग्रॉस कलेक्शन केले आहे. पुणे, पिंपरी–चिंचवड, मुंबई, नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, जळगाव, विदर्भ आणि मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरत आहे.

## व्यंगचित्रे




## सुविचार

**विश्वास ही मोठी ताकद आहे,**
**ती अशक्य गोष्टीही शक्य करते.**

## धर्म

# सौर ऊर्जा निर्मितीचा वेग आणि ग्रीडची कसोटी

भारत आज स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेकडे मोठ्या वेगाने वाटचाल करत आहे, केंद्र सरकारने जागतिक स्तरावर पर्यावरण बदलासाठी २०३० पर्यंत ५०० गिगावॅट नॉन–फॉसिल ऊर्जा क्षमता उभारण्याचे ध्येय जाहीर केले आहे. सौरऊर्जा ही या परिवर्तनाचा मुख्य आधार बनली आहे. मार्च २०२६ पर्यंत भारतात सुमारे १५० गिगावॅट सौरऊर्जा क्षमता उभारली गेली आहे. ही प्रगती नक्कीच जागतिक स्तरावर अभिमानाची आहे, पण त्यातून एक अति महत्त्वाचा प्रश्न समोर येतो तो म्हणजे सौरऊर्जा वाढवून आपल्या भारताची वीज व्यवस्था स्थिर विश्वासार्ह आणि चोवीस तास अविरत किफायतशीर पद्धतीने चालू राहील का? याला उत्तर आहे सध्याच्या परिस्थितीत पर्याय सोपा नाही आणि आपल्याकडे असलेल्या उपलब्ध तंत्रज्ञानात स्वस्त तर नक्कीच नाही.सौरऊर्जा उत्तम पर्याय आहे, पण ही ऊर्जा सतत उपलब्ध नाही. सौरऊर्जा उत्पादन फक्त सूर्यप्रकाशातच होते. साधारणपणे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत उत्पादन जास्त असते, तसेच ढगाळ आणि पावसाच्या वातावरणात कमी, सर्वसाधारणपणे भारतात विजेची मागणी सर्वाधिक केव्हा असते? सकाळी कामकाज सुरू होताना, संध्याकाळी आणि रात्री सर्वात जास्त विजेची मागणी असते, म्हणजेच सौर ऊर्जेमार्फत दिवसा वीज जास्त तयार होते, पण ग्राहकांची मागणी मात्र रात्री जास्त असते. यामुळे जर आपण पूर्णपणे सौर ऊर्जेवर अवलंबून असू तेव्हा 'दिवसाची अतिरिक्त वीज'आणि 'रात्रीची कमतरता' अशी परिस्थिती निर्माण होते. मग सध्या रात्री वीज कोण पुरवते, तर कोळसा आधारित वीज प्रकल्प जलविद्युत प्रकल्प, गॅस आणि डिझेल आधारित प्रकल्प, अणुऊर्जा प्रकल्प, आजही भारतातील बहुतेक वीजपुरवठ्यावरील स्त्रोतांवर आधारित आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, भारताच्या स्थापित ऊर्जा क्षमतेमध्ये कोळसा व इतर प्रकल्पांचा वाटा सुमारे ४३% असला तरी ते अजूनही देशाच्या ७०% पेक्षा जास्त वीज निर्मिती करतात, कारण ते सतत चालू ठेवता येतात. याचाच अर्थ असा की सौरऊर्जा वाढली की, ग्रीडचे प्रमाण बिघडून उपलब्धतेनुसार ग्रीडवर ताण येतो. ग्रीडमध्ये सौरऊर्जा जास्त प्रमाणात आल्यावर, दिवसा, पारंपरिक वीज प्रकल्पांची गरज कमी होते व संध्याकाळी, सूर्यास्त होताच सौरऊर्जा पूर्णपणे बंद होते, मग ग्रीडला काही मिनिटांत मोठ्या प्रमाणावर इतर प्रकल्प सुरू करावे लागतात. यालाच तांत्रिक भाषेत ‚ॅलिझ उॅर्ीअॅीश म्हणतात. डक कर्व्ह म्हणजे असा आलेख (ग्राफ) ज्यामध्ये दुपारच्या वेळी सौरऊर्जेचे उत्पादन खूप जास्त असल्यामुळे ग्रीडवरील निव्वळ मागणी कमी होते, त्यामुळे आलेखात पोटासारखा खोल भाग दिसतो आणि सूर्यास्तानंतर सौरऊर्जा अचानक कमी झाल्यावर संध्याकाळच्या वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी इतर स्त्रोतांकडून झपाट्याने वीज पुरवठा वाढवावा लागतो, त्यामुळे ह्याच आलेखात मानेसारखा तीव्र उंचावलेला भाग दिसता.याच कारणास्तव सौरऊर्जेवर चार्जेस लावले जात आहेत, कारण सौरऊर्जा कमी खर्चात पारेषित करण्यासाठी ग्रीड सप्लाय सतत चालू असावा लागतो, म्हणून अनेक राज्यांमध्ये सौरऊर्जेवर पुढील अतिरिक्त शुल्क आकारले जात आहेत, बँकिंग चॅर्जेस, व्हीलिंग चार्जेस, क्रॉस सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार, ग्रिड सपोर्ट चार्जेस, वीज वहन शुल्क त्यामुळेच सामान्य नागरिकांना प्रश्न पडतो, सरकार सौरऊर्जा प्रोत्साहन देते, मग हे चार्जेस का? यामागचे मुख्य कारण म्हणजे, वीज वितरण यंत्रणा (‚खडउजच्) आणि ग्रीड प्रणाली अजून विकेंद्रित सोलर मोठ्या प्रमाणात हाताळण्यास पूर्ण सक्षम नाही. याचा अर्थ, समस्या सौरऊर्जेमध्ये नाही तर ही समस्या ग्रीड व्यवस्थेच्या तांत्रिक आणि आर्थिक समायोजनात आहे.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# मा.नगरसेवक सोमेश यावलकर व सौ.आशादेवी सोमेश यावलकर यांच्या पुढाकारातून सवलतीच्या प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड आवश्यक; विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन





सांगोला : शहरातील नागरिकांना कॅशलेस, सुरक्षित व सुलभ प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) नोंदणी शिबिर शनिवार दि. २५ मे २०२६ ते शनिवार दि. १५ जून २०२६ या कालावधीत सांगोला शहरातील वज्राबाद पेठ विशेष नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिवसेनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात माजी नगरसेवक सोमेश यावलकर व सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांनी पुढाकार घेत नागरिकांसाठी विशेष नोंदणी मोहीम सुरू केली आहे. सांगोला शहर व परिसरातील प्रवाशांना एकाच कार्डद्वारे बस तिकीट, पेमेंट आणि विविध प्रवास सुविधा मिळाव्यात या उद्देशाने ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महिलां, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक यांना शासनाच्या योजनांनुसार मोठ्या प्रमाणात तिकीट सवलतीचा लाभ या कार्डद्वारे मिळणार आहे. योजनेअंतर्गत ७५ वर्षांवरील महिला व पुरुषांना १०० टक्के तिकीट माफी, तर ६५ वर्षांवरील नागरिकांना ५० टक्के तिकीट सवलत दिली जाणार आहे. तसेच महिला सन्मान योजनेंतर्गत महिलांनाही ५० टक्के तिकीट सवलतीचा लाभ मिळणार आहे. माजी नगरसेवक सोमेश यावलकर यांनी नागरिकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. भविष्यातील डिजिटल प्रवास व्यवस्थेत एनसीएमसी कार्ड महत्त्वाची भूमिका बजावणार असून, प्रत्येक नागरिकाने हे कार्ड काढणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांनीही महिलांनी व ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. नोंदणीसाठी आधार कार्ड, स्वतःचा फोटो व मोबाईल क्रमांक आवश्यक असून, दररोज सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत नोंदणी सुरू राहणार असून जास्तीत जास्त गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी नगरसेवक सोमेश यावलकर व नगरसेविका सौ आशादेवी सोमेश यावलकर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## मान्सूनबाबत हवामान खात्याकडून महत्त्वाची अपडेट

पुणे:- भीषण उकाड्याने आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, आज २३ मे रोजी नैऋत्य मान्सूनने नैऋत्य अरबी समुद्र, आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन परिसर तसेच बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांत यशस्वी प्रगती केली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. या आगामी काळात नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन क्षेत्र, बंगालच्या उपसागराचा आणखी मोठा भाग आणि उर्वरित अंदमान समुद्र मान्सूनच्या कक्षेत येण्याची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मान्सूनचा प्रवास असाच सुसाट राहिल्यास ५ जूनला गोव्यात दाखल होण्याची शक्यता आहे. तर ६ जूनला कोकणात आणि ७ जूनला पुण्यात मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे. आता मान्सून महाराष्ट्रात नेमका कधी दाखल होणार? यचकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## प्रा.प्रबुद्धचंद्र झपके सर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरीकांना भोजन



सांगोला (प्रतिनिधी): प्रा.प्रबुद्धचंद्र झपके सर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सांगोला येथे एक कौतुकास्पद सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. श्री.गणेश प्युअर व्हेज हॉटेलचे मालक श्री.गणेश भद्रशेट्टी यांच्या वतीने सांगोला येथील मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना सुग्रास भोजनाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. या अन्नदान प्रसंगी हॉटेल व्यावसायिक श्री. गणेश भद्रशेट्टी यांच्यासह परिसरातील काही प्रतिष्ठित नागरिक आणि मातोश्री वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक व कर्मचारी उपस्थित होते.

## पोलीस पाटलांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे : सिकंदर वर्धन





नाझरा (वार्ताहर):- पोलीस पाटील यांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करून गावातील घडामोडींची माहिती वेळोवेळी पोलीस ठाण्याला देणे आवश्यक आहे. पोलीस पाटील हा ग्रामस्थ आणि पोलीस प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा असल्याचे प्रतिपादन नूतन पोलीस उपनिरीक्षक सिकंदर वर्धन यांनी केले. नाझरे आऊट पोस्ट कार्यालयात आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी सांगोला तालुक्याचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित असल्याचे त्यांनी सांगितले. नाझरे पोलीस ठाण्यात नुकतीच नियुक्ती झाल्यानंतर पोलीस पाटलांनी केलेल्या सत्काराबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. तसेच यावेळी पोलीस पाटलांची आढावा बैठकही घेण्यात आली. या प्रसंगी पोलीस नाईक सुजित जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय भानवसे, पोलीस पाटील लक्ष्मण बनसोडे, संतोष भडंगे, श्रीमती सीता देवी पाटील, पांडुरंग पवार, सौ. वनिता कोकरे, रामचंद्र चौगुले, विकास आदाटे, संध्या नलवडे, गोपाळ जाधव, मंगेश जंवजाळ, विजय वाघमारे, ज्ञानेश्वर वाघमारे आदी उपस्थित होते.


**Health Department, Zilla Parishad Solapur**
**Tender For Procurement of Supply of Essential Medicine and Rate Contract For the Year 2026-27**

| Sr. No. | Details | Estimated tender amount in Lakh | Tender Form Fee in INRE | Arnest Money Deposit in INR | Eligibility |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Supply of Essential Medicine | 100.00 | 5,000/- | 1,00,000/- | Manufacturer/ Distributor |

Tender will be called On GEM ported.

Signed/-
District Health Officer
Zilla Parishad Solapur

Signed/-
Chief Executive Officer
Zilla Parishad Solapur


## क्रांतीज्योती महिला नागरी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन



सांगोला (प्रतिनिधी): क्रांतीज्योती महिला नागरी सहकारी पतसंस्था सांगोला यांची आज रविवार २४ मे रोजी सकाळी साडेदहा वाजता हर्षदा लॉन्स मिरज रोड सांगोला येथे वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली असल्याची माहिती संस्थेच्या चेअरमन सौ.भाग्यश्री रामचंद्र बनकर यांनी दिली आहे. सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या चेअरमन सौ.भाग्यश्री बनकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी हजर राहावे असे आवाहन संस्थेच्या व्हाईस चेअरमन सौ. दिपाली चंद्रकांत बनकर यांनी केले आहे.

# प्रा.डॉ.रामचंद्र यादव यांच्या सर्वसाक्षी कविता संग्रहाचे प्रकाशन

सांगोला(प्रतिनिधी):- किसन वीर महाविद्यालय, वाई ( जि. सातारा ) येथून सेवानिवृत्त झालेले मराठीचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामचंद्र यादव मूळचे आलेगाव , ता. सांगोला येथील राहणारे. सध्या त्यांचे वास्तव्य 'लिटल अर्थ' किवळे, पुणे ( पश्चिम ) या ठिकाणी आहे. 'सर्वसाक्षी' या नावाचा त्यांचा दुसरा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा अन्य मराठी पुस्तक प्रकाशनाच्या बरोबरीनेच नुकतेच के. एस. आय. प्रकाशन संस्थेने आयोजित केलेल्या २९ व्या मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे निमंत्रित प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. प्राध्यापक यादव सरांनी त्यांच्या 'सर्वसाक्षी' या संग्रहातील कवितामधूनही आपल्या अंतःकरणातील विविध भावानुभूतींचा प्रबळ आविष्कार केलेला आहे.येथे कौटु ंबिक नातेसंबंधातील, स्त्री पुरुष यांच्या परस्पर संबंधातील प्रेमाच्या विविध छटांचा आविष्कार केलेला आहे. येथे प्रेम कविता आहेत तसेच निसर्ग कविताही आहेत. येथे विविध पातळीवरचे सामाजिक जीवनाचे चित्रणही केलेले आहे .तसेच काही कवितांतून देशप्रेमाचाही आविष्कार केलेला आहे. यादव सरानी काही शृंगारिक लावण्याही लिहिल्या आहेत .तसेच काही कवितांतून आपल्या अंतःकरणातील उत्कट भक्ती भावनेचा आविष्कार केलेला आहे . त्यांच्या या आत्माविष्काराला सुंदर भावगीतांचे स्वरूप लाभले आहे. काही कवितांतून ग्रामीण जीवनातील व्यक्तिरेखांना जिवंत रूप प्राप्त करून दिले आहे. रसिक वाचक, साहित्यिक, जिज्ञासू संशोधक या कविता संग्रहाचे मनापासून स्वागत करतील अशी अपेक्षा आहे. या संमेलनातच प्रा. डॉ. रामचंद्र यादव यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते 'लोकनेते यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार' देऊन सन्मानीत करण्यात आले.

# योग्य मार्गदर्शनामुळे ब्रिलियन्सची चौथ्या वर्षी यशाची परंपरा कायम- तानाजी केदार

## नाझरा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

सांगाला (प्रतिनिधी):जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यामुळे ब्रिलियन्स नाझरे, ता.सांगोला क्लासेसची सलग चौथ्या वर्षी यशाची परंपरा कायम राखली असून, ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून अनेक विद्यार्थ्यांनी क्लासेसच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, त्यामुळे संस्थेचे संचालक प्रा.आशांक भोसले व विद्यार्थ्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे असे मत माजी वरिष्ठ सेवानिवृत्त मुख्याध्यापक तानाजी केदार यांनी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव प्रसंगी नाझरे येथे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी माजी सेवानिवृत्त मुख्याध्यापक कोंडीबा वाघमारे हे होते. सुरुवातीस अभ्यासाचे सातत्य हाच यशाचा खरा महामंत्र असल्याचे केंद्रीय मुख्याध्यापक सुरेश ढोले यांनी सांगितले. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यशाबद्दल आम्ही समाधानी आहोत असे कार्यक्रमाचे अध्यक्ष कोंडीबा वाघमारे यांनी यावेळी सांगितले. यावेळी विद्यार्थी पालक यांनीही मनोगत व्यक्त केले. सदर प्रसंगी माजी सेवानिवृत्त केंद्रीय मुख्याध्यापिका लक्ष्मी ढोबळे, मा.सेवानिवृत्त केंद्रप्रमुख मच्छिंद्र भोसले, मा.सेवानिवृत्त मुख्याध्यापक भारत वाघमारे, विनोद देशपांडे, प्रा.राहुल वाघमारे, प्रा.प्रमोद केंगार, प्रा. मोहन भोसले, पत्रकार रविराज शेटे, संजय सुतार, पोलीस पाटील लखन पाटील यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक शिवभूषण ढोबळे यांनी तर आभार प्रा. अशांक भोसले यांनी मानले.

# सांगोला तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

सांगोला(प्रतिनिधी):- सांगोला पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीविरोधात कारवाई करत सुमारे २ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शुक्रवार दि. २१ मे २०२६ रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास सोनंद ते गळवेवाडी मार्गावर करण्यात आली. पोलीस अंमलदार मदतनीस सदाम नदाफ हे पथकासह गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, माण नदी पात्रातून वाळू भरुन एक बिस्कीट रंगाचा ४०७ टेम्पो सोनंद गावाकडे येत आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. दरम्यान, संबंधित वाहन दिसताच पोलिसांनी थांबविण्याचा इशारा केला. मात्र चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला सोडून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे एक ब्रास वाळू आढळून आली.या कारवाईत सुमारे २ लाख रुपयांचा ४०७ टेम्पो व ७ हजार रुपयांची वाळू असा एकूण २ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०५ (ई) व ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी नियमित वाचा

साप्ताहिक माणदेश वार्ता

# सहकार विभागाच्या जी.डी. सी.अँन्ड ए.व सी.एच.एम. परिक्षा २६ मे पासून सुरु

सोलापूर :- सहकार विभागामार्फत माहे मे. २०२६ मध्ये घेण्यात येणारी जी. डी. सी. अँन्ड ए. व सी. एच. एम. परिक्षा दि. २६, २७ व २८ में २०२६ रोजी सिध्देश्वर प्रशाला, सिध्देश्वर पेठ, सोलापूर या केंद्रावर घेण्यात येणार आहेत. सदर परिक्षेसाठी परीक्षार्थीना ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. ज्या परिक्षार्थिना तांत्रिक कारणास्तव ऑनलाईन प्रवेशपत्र मिळू शकले नाही आणि ज्या परिक्षार्थिचा मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त हजेरीपटामध्ये समावेश आहे अशा परीक्षार्थीना परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येईल. अशा परिक्षार्थीनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र (आधारकार्ड, वाहन परवाना, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड इ.) सोबत आणणे आवश्यक आहे असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर, यांनी कळविले आहे

# महागाईचा भडका! पेट्रोल-डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ

मुंबई:- पंतप्रधान नरेंद्र मोदी तमाम देशवासियांना आगामी काळात इंधनाचा वापर जपून करण्याचे कळकळीचे आवाहन केल्यानंतर अनेकांना भविष्यातील आर्थिक अरिष्टाची चाहूल लागली होती. ही भीती आता खरी ठरताना दिसत असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आता तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. सर्वप्रथम १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच २० मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. त्यावेळी पेट्रोलच्या दरात ८६ पैसे आणि डिझेलच्या दरात ८३ पैशांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी सकाळपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ झाली. त्यानुसार पेट्रोलचा प्रतिलीटर दर ८७ पैसे आणि डिझेलची प्रतिलीटर किंमत ९१ पैशांनी वाढले आहेत. त्यामुळे पेट्रोलचा प्रतिलीटर दर १०८.४५ रुपयांवर पोहोचला आहे. तर डिझेलचा प्रतिलीटर दर ९५.०२ रुपयांवर पोहोचला आहे.

# महाडीबीटी पोर्टलवरील अनुसूचित जाती विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी २६ मे रोजी कार्यशाळा

सोलापूर: महाडीबीटी पोर्टलवर सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्यासाठी सोमवार दि.२६ मे २०२६ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी दिली. सदर कार्यशाळेस संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणारे कर्मचारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार असून संबंधितांनी वेळेत उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सोलापूर यांनी कळविले आहे.

# फॅबटेक पॉलिटेक्निक मधील १८ विद्यार्थ्यांची पार्क रोबोटिक्स प्रा. लि. कंपनीत निवड

सांगोला(प्रतिनिधी):- फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील ज्योती पुजारी, सानिका भोसले, पृथ्वीराज गोडसे, कृष्ण ताजव, तुकाराम होनमाने, संकल्प बुडबुडे, श्रेयस घाडगे आदी ७ विद्यार्थ्यांची आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील रोहन इंगळे, यशराज जाधव, सुप्रिया सराटे, राजरत्न नवगिरे, पौर्णिमा लेंडवे, दीपक अनुसे, शिवराज इंगोले, विनायक खटके, आदित्य शिंदे, दीपक देसाई आणि शुभम मोटे आदी ११ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड पार्क रोबोटिक्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत करण्यात आली आहे. यएस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी बुरुंगले, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.महेश वाळूजकर आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.दत्तात्रय नरळे आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.